दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९६ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरूवार दि.१८ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ‘अब की बार सुधीरभाऊ खासदार’
# आ.जोरगेवारांनी केली दमदार घोषणा
## चंद्रपूरच्या विकासासाठी ना.मुनगंटीवार यांनी घेतली गॅरंटी







**चंद्रपूर । प्रतिनिधी**
आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वातील यंग चांदा ब्रिगेड समर्थन व पाठिंबा देत माझ्यासोबत आली आहे. हा विचारांचा संगम आहे. याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, रिपाई (आठवले गट), पीपल्स रिपब्लिकन पार्टी (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.
यंग चांदा ब्रिगेड तर्फे शकुंतला लॉन, नागपूर रोड, चंद्रपूर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. मंचावर चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार, त्यांच्या पत्नी कल्याणी जोरगेवार, शिवसेनेचे चंद्रपूर जिल्हा संपर्कप्रमुख किशोर राय, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन मते व बंडू हजारे, प्रकाश देवतळे, नामदेव डाहुले, प्रतिमा ठाकूर, भरत गुप्ता, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला प्रमुख वंदना हातगावकर, सविता दंडारे, सायली येरणे, सरोज चांदेकर, अजय जयस्वाल यांच्यासह भाजपा महायुती तसेच, यंग चांदा ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होते. रामनवमी निमित्त सर्वांना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, देशामध्ये सध्या विश्वगौरव मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांचा ‘टॉवर’ कार्यरत असून त्यात चुकून कॉंग्रेसचे सीम टाकल्यास नेटवर्क मिळणार नाही. विक सिग्नलमुळे संवाद होणार नाही. त्यामुळे योग्य मोबाईल मध्ये योग्य ते सीम टाका, असा सल्ला त्यांनी दिला.कुणबी समाजाचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून यंदा ‘ना जात पर, ना पात पर राजनिती होगी विकास पर’, हे लक्षात ठेवा. प्रतिस्पर्धी उमेदवार विकासावर चर्चा करत नसून सोशल मिडीयावर निच प्रचार करत आहे. जे लोक चुकीचे काम करत आहेत, त्यांचा निश्चितपणे पराभव होईल.देशात मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती मोदींजीनी केली आहे. लोकसभेची ही लढाई कोणा एका व्यक्तीची, त्याच्या मोठेपणाची नसून ही देशाच्या, तिरंग्याच्या सन्मानाची आहे असे ना. मुनगंटीवार म्हणाले.चंद्रपूर जिल्हा हा शासन दरबारी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाने ओळखला जातो. त्यांनी या जिल्हयाचा समग्र विकास केला. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. अफाट शक्ती, नियोजनबद्ध व प्रत्येक विषयावर सखोल अभ्यास करून आकडेवारीसह विश्लेषण करणारे ना. मुनगंटीवार यांची विकासाची दृष्टी विस्तीर्ण असून त्यांना लोकसभेत पाठवल्यास केंद्राच्या विकासाच्या योजनादेखील ते चंद्रपूरपर्यंत आणतील, याची मी ‘गॅरंटी’ देतो, असे म्हणत यंग चांदा ब्रिगेडचे सरसेनापती व चंद्रपूरचे आ. किशोर जोरगेवार यांनी ‘अब की बार सुधीरभाऊ खासदार’ अशी दमदार घोषणा केली.

### ना. मुनगंटीवार विकासाचे ‘ब्लूप्रिंट’ – आ. किशार जोरगेवार
ना. मुनगंटीवार हे माझे गुरू आहेत, असा उल्लेख करून आ. किशोर जोरगेवार म्हणाले, सध्या संपूर्ण देशाचे लक्ष मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्याकडे तर महाराष्ट्राचे लक्ष ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे लागले आहे. ना. मुनगंटीवार हे एक लाखापेक्षा अधिक मतांनी निवडून येत लोकसभेत जातील, असा मला विश्वास आहे. चंद्रपूरमध्ये विकासाची खूप ताकद असून ही ताकद जगाला दाखवण्याची ही उत्तम संधी आहे. ना. मुनगंटीवार हे केवळ चंद्रपूरचे नाही तर राज्याच्या विकासाचे ‘ब्लूप्रिंट’ आहेत, असे आ. जोरगेवार म्हणाले.

# नोव्हेंबर २००५ पुर्वीच्या जाहिरातनुसार सेवेत रुजू शिक्षकांना जुनी पेंशन लागूचा आदेश निर्गमीत
## महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती च्या पाठपुराव्यास यश

**मूल । प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाने १ नोव्हेंबर २००५ पासुन शासन सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-यांना एनपीएस योजना लागू केली पण ज्या कर्मचा-यांची पदभरतीची जाहिरात १ नोव्हेंबर २००५ पुर्वीची आहे मात्र सेवेत रुजू दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून आहे अशा शिक्षकांना जुनी पेंशन योजना लागू करण्याचा महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.परंतू जिल्हा परिषद ने आपल्या जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या अशा शिक्षकांची विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रे मागितले नसल्याने संभ्रम निर्माण झालेला होता. महाराष्ट्रातील अनेक जिल्हा परिषदांनी या संबंधी माहिती संकलीत करण्यासाठी पत्र काढले होते पण जिल्हा परिषद चंद्रपूर ने पत्र निर्गमीत न केल्याने शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता त्यासाठी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती ने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना निवेदन दिले व वारंवार भेटी घेऊन पाठपुरावा केला आणि इतर जिल्हा परिषद ने जुनी पेंशन योजना लागू करण्यासाठी शिक्षकांची माहिती संकलीत करीत आहेत मग आपली जिल्हा परिषद मागे कां अशी प्रशासनाला वारंवार विचारणा करण्यात आली आणि यासंबधीचे पत्र शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी निर्गमीत केले. महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती च्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. जुनी पेंशन योजना लागू करण्याचे पत्र निर्गमीत करण्यासाठी संघटनेचे राज्य नेते विजय भोगेकर राज्य सरचिटणीस हरीश ससनकर राज्याध्यक्षा पुरोगामी महिला मंच अल्का ठाकरे,जिल्हा नेते नारायण कांबले,जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार,जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर, जिल्हा कार्याध्यक्ष गंगाधर बोढे, जिल्हा कोषाध्यक्ष सुनिल कोहपरे दिवाकर वाघे व जिल्हा पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले असे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी कलविले आहे.

# श्रीराम मंदिराजवळ घराला आग अंदाजे दोन लाखाचे नुकसान



**पुलगाव । प्रतिनिधी**
येथील नदी फैल भागातील श्रीराम मंदिरासमोर राहणारे चंदू सडमाके यांच्या घराला आग लागल्याने संपुर्ण घर जळून खाक झाले.
आज दि.१७ ला सायंकाळी ७-३० च्या दरम्यान चंदू सडमाके यांच्या घराला अचानक आग लागली. पाहता पाहता घराने पेट घेतला. आजूबाजूच्या लोकांनी पाणी टाकून आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु तोपर्यंत घर जळून खाक झाले होते. नगर परिषद ची अग्निशमन गाडी बंद असल्यामुळे पोहचू शकली नाही. अग्निशमन दलाचे कर्मचारी मात्र घटनास्थळी मदतीला पोहोचले.केंद्रीय दारूगोळा भांडाराची गाडी लवकर पोहोचली. चंदू सडमाके यांचा परिवार रोजमजुरी करून काम करतो. विद्युत शॉर्ट सर्किट मुळे आग लागली असावी असा अंदाज आहे.

# तयार झाला लोकसभा निवडणुकीचा माहौल




**मूल । प्रतिनिधी**
लक्षात असू द्या, मतदार बंधू-भगिनींनो, मतदान करायचे आहे!लोकसभा निवडणुकीनिमित्त काका, काकू, मावशी, आत्या, मामा, मामी, आजी, आजोबा या नात्यांना मतांसाठी आता उजाळा मिळाला आहे. मतदार बंधू-भगिनींनो, काही चुकले असेल तर माफ करावे; परंतु यावेळी आपल्या राजकीय पक्षांनी दिलेली संधी पुन्हा येणे शक्य नाही. त्यामुळे थेट या नातेवाइकांसमोर मतांच्या जोगव्यासाठी विनवणी करणे, हात जोडणे उमेदवारांनी सुरू केले आहे. एरवी मावशी, आत्याकडे फारसा लक्ष न देणारा भाचासुद्धा आता लक्ष द्यायला सांगतो आहे.चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे.
१३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पुन्हा एकदा पाच वर्षांनंतर का होईना, जुन्या नात्यांना मतांमुळे चार्जिंग मिळू लागले आहे. कसभेची निवडणूक अतिशय रंगतदार; पण तेवढीच चुरशीची होणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या आखाडयात उतरलेल्या उमेदवारांनी मते मिळविण्यासाठी विविध उपाययोजना अवलंबायला सुरुवात केली आहे. राजकीय पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी आपापल्या मतदारसंघातील
नातेवाइकांच्या याद्या तयार केल्या आहेत. संबंधित नातेवाइकांचे मागील अनेक वर्षांचे असलेले संबंध, त्यावेळी त्यांच्या लग्नकार्यात आपण सहभागी झालो होतो, मुलाच्या वाढदिवसाला तर, वडिलांच्या तेरवीच्या कार्यक्रमाला आलो होतो, अशा प्रकारच्या मागील जुन्या आठवणींना आता उजाळा दिला जात आहे. वीस ते पंचवीस वर्षांपूर्वी घडलेल्या एखाद्या घटनेची माहिती मतदार नातेवाइकांना नाही; परंतु संबंधित उमेदवार व पक्षातील कार्यकर्ते त्या आठवणीला उजाळा देत आहेत.चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे.
प्रशासनही लागले कामाला १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता
लोकसभा निवडणुकीसाठी अवघ्या दोन दिवसांचा कालावधी उरला आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी मतदारसंघात प्रशासनाकडूनही तयारी केली जात आहे. मतदान केंद्रे सज्ज होत असून, निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणे सध्या सुरु आहेत. पथके स्थापन करण्यात आली आहेत. एकंदरीत लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा माहौल तयार झाला आहे.

# अभाविप कामाचा अनुभव अनमोल-वैभव डांगे
## अभाविप पुर्व कार्यकर्त्यांचे स्नेहमिलन;वैभव डांगे यांची उपस्थिती



**पुलगाव । प्रतिनिधी**
अभाविपचे कार्य करीत असताना अनुभवाची शिदोरी प्राप्त होते. या शिदोरीचा उपयोग जीवनातील विविध क्षेत्रात कार्य करीत असताना अनमोल असतो. परिषदेचे कार्य करीत असताना येत असलेले अनुभव अविस्मरणीय आहेत. ते कधीच विसरू शकत नाही.या संघर्षमय जीवनातून भविष्यातील यशाचा सुर्य उगवतो असे प्रतिपादन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कामातील पुर्व कार्यकर्ते,केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांचे पूर्व स्वीय सचिव व आयआयएम नागपूर चे संचालक वैभव डांगे यांनीकेले.
पुलगाव येथे दि.१६ एप्रिलला रात्री सदिच्छा भेट दिली असता स्थानिय पुनम पॅलेस येथे १९९५ ते २००० या कार्यकाळात परिषदेच्या कामातील सर्व सहकारी मित्रांच्या सहपरिवार स्नेहमिलन व सहभोजन कार्यक्रमात उपस्थित राहून परिषदेच्या कामातील जुन्या आठवणींना यानिमित्ताने उजाळा मिळाला व संघटनेच्या कामातील अनेक मनोरंजक किस्से यानिमित्ताने ऐकायला मिळाले.
यावेळी मानस उद्योगाचे व्यवस्थापक जयंत ढगे,भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे, धर्म जागरण जिल्हा संयोजक अविनाश भोपे प्रामुख्याने उपस्थित होते. वैभव डांगे यांचा सत्कार संजय गाते यांनी केला. जयंत ढगे यांचे स्वागत मंगेश झाडे यांनी केले. ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष झाल्याबद्दल संजय गाते यांचा सत्कार वैभव डांगे यांनी केला. यावेळी संजय गाते व जयंत ढगे यांनीही मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक व परिचय अविनाश भोपे यांनी करून दिला. संचालन सागर पेरके तर आभार मंगेश झाडे यांनी मानले.यावेळी श्याम उपाध्याय, प्रा अमित चिनेवार, सुशांत बीरे,गजेंद्र गालपिल्लेवार, सागर पेरके,धिरज तिवरे, प्राचार्य धनंजय शिंगणजूडे, राजेश गुप्ता,प्रशांत इंगोले, श्रीकांत बिरे, चंद्रशेखर बेले, संदीप बोरकुटे,सचिन कासार, पंकज होले इत्यादी सहपरिवार उपस्थित होते.

# पेन्सिलने रेखाटले गौरीने श्री रामाचे चित्र



**पुलगाव । प्रतिनिधी**
आजच्या युगात मुलांची प्रतिभा विविध कार्य कलापातून दिसून येते. अनेक दिवसापासून आपल्या रांगोळीच्या माध्यमातून सर्वांना मोहित करणारी येथील हरिराम नगर निवासी गौरी नितीन गुप्ता क्या तेरा वर्षीय बालिकेने चारकोल पेन्सिलच्या साह्याने प्रभू श्रीरामाची प्रतिमा निर्माण केली. यासाठी तिला चार दिवसाचा कालावधी लागला. रामनवमीच्या पावन पर्वावर तिने ही प्रतिमा दर्शनासाठी ठेवली. या सुंदर प्रतिकृतीचे सर्वांनीच कौतुक केले आहे. येथील गांधी सिटी पब्लिक स्कूल मध्ये शिकणारी गौरी नवव्या वर्गाची विद्यार्थिनी असून अभ्यासाबरोबरच विविध हस्तकलांमध्ये निपुण आहे.

# विकास हीच माझी जात, संधी द्या, मतदान व्यर्थ जाणार नाही-पंकजाताई

## पंकजाताई सर्व अठरापगड जातींना सोबत घेऊन जाणारं नेतृत्व-विक्रमी मताधिक्यासाठी रमेश आडसकरांनी कंबर कसली

**केज । प्रतिनिधी**

आपला जिल्हा,आपली माणसं एवढाच दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन मी सत्तापदाच्या काळात केवळ विकासाचं राजकारण केलं. हा जिल्हा पश्चिम महाराष्ट्रापेक्षाही विकासाच्या प्रवाहात पुढे जावा हे माझं स्वप्न आहे. तुम्ही हृदयावर हात ठेवुन माझ्यावर विश्वास ठेवा, दिलेलं मतदान वाया जाणार नाही, विकास हीच माझी जात असून पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच पुन्हा तिसर्यांदा पंतप्रधान होतील तेव्हा त्यांच्याकडून क्षणोक्षणी जिल्ह्याचं भाग्य उजळण्यासाठी मी मिळालेल्या संधीचं सोनं केल्याशिवाय रहाणार नाही या शब्दांत लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी मतदारांना आवाहन केले. दरम्यान पंकजाताई म्हणजे सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेवुन चालणारी शक्ती असुन मागच्या लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणेना पाच लाख मते मिळाले. मात्र पाच वर्षात कुठल्या बिळात लपले? हा सवाल करत आडसकरांनी जातीपातीपेक्षा पुढे जावुन सामान्य जनतेच्या हितासाठी पंकजाताईचं नेतृत्व जपावे एवढेच नव्हे तर आम्ही सर्व खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे असल्याचे प्रतिपादन केले. केज येथे शारदा इंग्लिश स्कुल प्रांगणात महायुतीच्या कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा पार पडला. त्याप्रसंगी मान्यवर बोलत होते. जनसमुदायासमोर बोलताना पंकजाताई पुढे म्हणाल्या, माजलगाव मतदारसंघा एवढंच लक्ष्य आडसकरांचं केज तालुक्यात आहे. मागील पंधरा वर्षापासुन आम्ही एकत्र काम करतो. सामान्य माणुस हाच खर्या अर्थाने माझ्या राजकारणाचा केंद्रबिंदु आहे हे सांगताना मी जिल्ह्यात केवळ विकासाचं राजकारण केलं, त्यामुळे कुणाचीही तक्रार माझ्याविरोधात व्यक्तीद्वेषाची नाही हीच माझ्या कामाची पावती म्हणावी लागेल. विरोधकांना प्रचारात माझ्या विरोधात मुद्दाही नाही. पालकमंत्री म्हणून केलेल्या विकासाची कामं निवडणुक प्रचारात ठिकठिकाणी गेल्यानंतर लोक मलाच सांगतात की, ताई तुमच्यामुळे ही योजना आली. मी जातीपातीचं राजकारण कधी केलं नाही. वेगवेगळ्या चर्चा सामाजिक करणावर जेव्हा पुढे येतात त्यावेळी यात माझा गुन्हा काय? हा सवाल करत त्यांनी तुम्ही हृदयावर हात ठेवुन मला मतदान करा. तुम्ही टाकलेला विश्वास तिळाएवढा ढळू न देता केंद्र सरकारच्या सर्व योजना एवढेच नव्हे तर दहा हजार तरूणांना रोजगार मिळेल एवढा उद्योग आपल्या जिल्ह्यात आणुनच दाखवेल. कॅन्सर अद्ययावत हॉस्पीटल उभा करून गोरगरिबांच्या आरोग्य रक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.माझ्या रूपाने फार मोठी संधी तुम्हाला चालुन येत आहे. त्यामुळे जात, धर्म नाराजी एका बाजुला तर मिळत असलेली संधी दुसर्या बाजुला. वैचारिक विचार जर केला तर केवळ एकदा संधी देवुन बघा, मी सेवकाच्या भुमिकेत काम केल्याशिवाय रहाणार नाही. संविधानिक पदाची संधी सामान्य जनतेच्या हितासाठी असते. जे मी पालकमंत्री असताना करून दाखवलं. अगोदर मी केले हे सांगताना बीड-नगर-परळी रेल्वेचा प्रश्न आणि राष्ट्रीय महामार्ग बांधणी केली. ज्यामुळे देशाच्या नकाशावर आपला जिल्हा आला. शत्रुला देखील मी विकासाच्या कामात मदत केली. कुणालाही वैयक्तिक द्वेषापोटी त्रास दिला नाही. कुठल्याही संकटात आम्ही धावुन आलो. मग पाच वर्षे विरोधी उमेदवार कुठे होते? हा सवाल त्यांनी केला.भाजपा नेते रमेश आडसकरांनी नेतृत्वाला पाठिंबा देण्यासाठी बोलवलेल्या बैठकीचे रूपांतर जाहिर सभेत झाले. त्यात बोलताना पंकजाताई ह्या केवळ विकासाची वाघीण असुन मागच्या काही वर्षापासून त्यांना आम्ही जवळुन पहातो. जातीवाद त्यांच्या स्वभावात नक्कीच नाही. कारण विकासाच्या प्रश्नावर त्यांनी सकारात्मक घेतलेली भुमिका ज्यामुळे आपल्या जिल्ह्याचे राजकारण त्या काळात व्यक्तीद्वेषाकडे कधीच गेलं नाही. बजरंग सोनवणे यांना मागच्या निवडणुकीत बर्यापैकी मते मिळाली. पण पाच वर्षात कधीच यांनी सामान्य जनतेला तोंड दाखवलं नसल्याचा आरोप त्यांनी केला. जुन्या आणि नव्या लोकांची सांगड घालुन मी सामान्य जनतेची सेवा करतो. त्यामुळे गोरगरिबांचा विश्वास आमच्यावर असुन पंकजाताईला प्रचंड मताधिक्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आपला खासदार निवडुन आल्यानंतर केंद्रात वजनदार मंत्री होणार त्यामुळे जिल्ह्याचं भाग्य निश्चित उजळेल हे सांगताना त्यांनी मराठा आरक्षणावर मुंडे कुटुंबियांनी राजकारण न करता नेहमीच आपल्याला पाठिंबा दिल्याचे ठणकावुन सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते ऋषी आडसकर यांनी केले. केज नगर परिषद गट नेता हारूण इनामदार यांनी भगिनी पंकजाताईला मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने मतदान करतील हे सांगताना स्व.मुंडे साहेबांचं स्वप्न साकार करण्याची क्षमता ताईमध्ये असल्याने आम्ही त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहू हे सांगितले.यावेळी बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, नगराध्यक्ष सीताताई बनसोड, भागवतदादा गोरे, नाना गुरूजी, डॉ.योगिता थोरात, धैर्यशील देशमुख, सुमन धस, उषा मुंडे, उत्तमराव आणे, गोरख रसाळ, गौतम चौधरी, सर्जेराव वाघमोडे, युवराजदादा काळे, दिलीपआबा गुळभिले, संदिप पाटील, दिपक शिंदे, महादेव आदमाने गुरूजी आदीसह विविध गावचे सरपंच,चेअरमन, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते



# रक्तदान शिबीराद्वारे महामानवास अभिवादन



**परभणी । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून रविवार १४ एप्रिल रोजी बोरी येथील सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्था व जयहिंद लोक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरातून महामानवास भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीतील रक्ताचा तुटवडा लक्षात घेवून बोरीतील या दोन्ही संस्थांनी सामाजिक बांधिलकीपोटी रक्त संकलनाचा संकल्प सोडला. बोरीतील ग्रामीण रुग्णालयात जयंतीचे औचित्य साधून खास रक्तदान शिबीर आयोजित केले. त्यात ६१ दात्यांनी रक्तदान करुन त्याद्वारे आपली सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी आयोजक नागसेन भेरजे यांनी शिबीरामागील भूमिका विशद केली. पोलिस निरीक्षक सरला गाडेकर, दिनकरराव चौधरी यांनी मार्गदर्शन केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. पवार, डॉ. किरण बकान, डॉ. कल्याण मोरे, दासराव कनकुटे, राहुल गोरे, शेख वसीम, प्रेम कनकुटे, मुसव्वीर पठाण, संतोष साखरे, मनोहर भालेराव, संभाजीराव चौधरी, योगेश चौधरी, गजानन साबळे, विकास काळे, गोपाळ विरला, दुर्गेश चौधरी, दीपक प्रधान विशाल दीपके यांच्यासह अन्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयंतीनिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना खोलेश्वर महाविद्यालयात अभिवादन

## शिक्षण हे समाज निर्मितीचे साधन आहे - माजी प्राचार्य रा.गो.धाट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शिक्षण हे समाज संघटित करण्याचे साधन असून तत्कालीन काळात वंचित समाज घटक आणि महिला यांच्या उत्थानासाठी खूप मोठे कार्य भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आपण केवळ शिक्षण घेवून उपयोगाचे नाही. तर शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाची अंमलबजावणी कशी करायची हे आपणास समजले पाहिजे, त्यासाठी समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुता निर्माण करण्याची आवश्यकता आहे, म्हणून शिक्षण हा संस्कार आहे आणि शिक्षण हे समाज निर्मितीचे साधन आहे, साध्य नाही, असे प्रतिपादन खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी केले. ते खोलेश्वर महाविद्यालयात सांस्कृतिक आणि संगीत विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारणीचे सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य डॉ.प्रवीण जोशी, सदस्य सौ.संगिताताई धर्मराव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना माजी प्राचार्य धाट यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा परिचय करून देताना डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन आणि कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली तसेच त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ अनुसार प्रत्येकाला शिक्षणाचा मुलभूत अधिकार देवून डॉ.आंबेडकर यांनी सर्वांना शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश दिला असे सांगितले. डॉ.आंबेडकर यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या विचारधनातून आपण काही तरी घेऊ व त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालू अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना रामभाऊ कुलकर्णी म्हणाले की, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारख्या महान व्यक्तींच्या कार्याला स्मरून आपण जर जीवन जगलो तर समाजोन्नती नक्की होईल अशा भावना या प्रसंगी कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.तात्या पुरी यांनी केले. ते म्हणाले की, अभ्यास मंडळाच्या वतीने वर्षभर विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे उद्बोधन होईल अशा प्रकारचे विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.कालिदास चिटणीस यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.शैलेश पुराणिक यांनी मानले. मुख्य कार्यक्रमापूर्वी सकाळी नऊ ते दहाच्या दरम्यान खोलेश्वर महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित भीमगीतांच्या गायनाचा अतिशय सुरेख व प्रबोधनपर असा कार्यक्रम सादर करून महामानवांना अभिवादन केले. यावेळी कु.क्रांती एडके, कु.प्रतिक्षा भुतकर, सौ.मनिषा वैरागे, शाहीर गणेश मामा काळे, बळीराम उपाडे, प्रा.महादेव माने आदींनी गायन केले. तर सिंथेसायझरवर विकास एडके, पांडुरंग कुलकर्णी व सिद्धार्थ आवशंख यांनी साथ-संगत केली. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी मतदारसंघातुन प्रीतमताई पेक्षा पंकजाताईंना जास्त मताधिक्य देण्यासाठी कामाला लागा-आ.बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड लोकसभेच्या निवडणुकीत पंकजाताई गोपीनाथ मुंडे या विकासाची वाट धरून चालणाऱ्या उमेदवार आहेत त्यांना १०० टक्के मंत्रीपद मिळणार असल्याने विकास कामे खेचून आणण्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे कार्यकर्त्यांना ज्या अडचणी येथील त्या कार्यकर्त्यांनी तात्काळ सांगाव्यात त्या दूर केल्या जातील बीड जिल्ह्याचे नाव देशात गाजवण्यासाठी पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना प्रीतमताई मुंडे यांच्या पेक्षा जास्त मतांनी निवडून द्या असे आवाहन आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे देशाचे नाव जगात झाले आहे शेतीमध्ये हरितक्रांती घडवून मुबलक प्रमाणात उत्पन्न वाढ झाली आहे या सर्वांचा विचार करता आपल्या बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या हक्काच्या खासदार पंकजाताईंना निवडून द्यावे असे आवाहन यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले

बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ दौलावडगाव जिल्हा परिषद गटातील महायुतीच्या कार्यकर्त्यांची बैठक जाधव मंगल कार्यालय या ठिकाणी रविवार दिनांक १४ एप्रिल रोजी आमदार बाळासाहेब आजबे काका व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थित बोलवण्यात आली होती या बैठकीला दौलावडगाव गटातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की देशात पुन्हा एकदा भाजप प्रणित मोदी सरकार येणार असल्याने जनतेने प्रवाहाच्या विरोधात जाऊ नये व भाजपा सरकार आल्यानंतर पंकजाताई गोपीनाथ मुंडे या शंभर टक्के केंद्रीय मंत्रिमंडळात जाणार आहेत त्यामुळे राज्य सरकार व केंद्र सरकार हे एकाच विचाराचे जर असेल तर मोठ्या प्रमाणात विकास कामे आणता येतात .माजी आमदार व माझे सहकारी भीमरावजी धोंडे साहेब आपण एकत्र मतदारसंघांमध्ये जिल्हा परिषद गट निहाय बैठका घेत आहोत यापूर्वी आम्ही पिंपळा या ठिकाणी हजारो कार्यकर्तेच्या उपस्थितीमध्ये बैठक घेतली आहे धोंडे साहेब व माझ्यात काहीही वाद नाही ज्येष्ठ म्हणून आपण नेहमी त्यांचा सन्मान व त्यांचा सल्ला घेतो, मराठा आरक्षण हे टिकणार आहे जेवढे ओबीसी नोंदी सापडतील ते ओबीसी मध्ये जातील राहिलेना१० टक्क्यांचा फायदा होईल महाराष्ट्र शासनाने मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार दहा टक्के आरक्षण दिले आहे त्यामुळे हे आरक्षण सुप्रीम कोर्ट टिकणार आहे राज्य सरकार त्याची योग्य बाजू मांडणार असल्याकारणाने कोणीही गैरसमज करून घेऊ नये मागासवर्ग आयोगाचा अहवाल पॉझिटिव्ह आल्याने हे आरक्षण टिकणार आहे विनाकारण समाजा समाजामध्ये वातावरण दूषित करण्याचे काम काही लोकांकडून केले जात आहे ते आता बंद करावे आम्ही सगळे आरक्षणाच्या बाजूने आहोत आम्हालाही वाटते मराठा समाजाला आरक्षण मिळावे राज्य सरकार त्यासाठी प्रयत्नशील आहे, विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात सरकारकडून निधी आणला आहे मतदारसंघात आतापर्यंत जवळपास दोन हजार कोटीची कामे झाली आहेत व काही विकासाच्या प्रगतीपथावर आहेत राहिलेले चार टीएमसी पाणी आपण आणणारच असून १.६८ टीएमसी पाण्याची पाईपलाईनचे काम सुरू आहे थेट पाईपलाईनने पाणी आणण्याचे काम होणार असल्याने लवकरच खुंटेफळ साठवन तलावामध्ये पाणी येऊन हा भाग समृद्ध होणार आहे हे सर्व करायचे असेल तर आपल्याला पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना केंद्राच्या मंत्रिमंडळात पाठवायचे आहे. त्यासाठी पंकजाताईंना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आव्हान यावेळी आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी केले. खुंटेफळ पाईपलाईनचे काम एक वर्षा वर्षात पूर्ण होईल पर्यावरणाची मान्यता आपण आमदार झाल्यानंतर आणली शेडगाव पेडगाव ऐवजी आपण शिंपोरा येथून थेट पाईपलाईनचे पाणी आणण्यासाठी प्रयत्न केले होते व ते यशस्वी झाले त्यामुळे सत्तेत असलो तरच हे सर्व मोठाली कामे मार्गी लागतात म्हणून आपण अजित दादा पवार यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला आहे मी



अजितदादा बरोबर जाण्याअगोदर सर्व ज्येष्ठ नेत्यांना विश्वास घेतले होते, पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्य आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून देण्यासाठी मी व आमदार माजी आमदार धोंडे साहेब प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.यावेळी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की मोदी पंतप्रधान मोदी यांच्यामुळे देशाचे नाव जगात झाले आहे त्यांनी संरक्षण क्षेत्रामध्ये भरपूर काम केले आहे आज देशांमध्ये विविध प्रकारच्या हत्यारे दारुगोळा बनवण्याच्या कंपन्या स्थापन झाल्या आहेत आज आपण अनेक बाबींमध्ये स्वावलंबी झालो असून शेती क्षेत्रामध्ये ही मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढ झाली आहे गरिबी हटवण्यासाठी मोठे यश मोदींना आले आहे मोठ्या प्रमाणात निर्यात विविध वस्तूंची केली जाते त्यातून देशाला फायदा मिळत आहे दिवस रात्र काम करणारे पंतप्रधान आपल्याला लाभले असून आघाडीतील दहापेक्षा जास्त नेते पंतप्रधान होण्यासाठी इच्छुक आहेत त्यामुळे या आघाडीत बिघाडी होणार आहे आपल्या महायुतीकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकमेव उमेदवार असल्याने त्यांना यापुढेही पाच वर्षे संधी मिळणार आहे पंकजाताईंना केंद्रात पाठवल्यानंतर अनेक मोठी कामे मार्गी लागणार आहेत त्यासाठी आपण पंकजाताईंना प्रीतम ताई मुंडे यांच्या पेक्षा भरघोस मतांनी निवडून द्यायचे आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन भीमराव धोंडे यांनी शेवटी केले . यावेळी वाल्मीक तात्या निकाळजे, शंकर देशमुख भाऊसाहेब लटपटे ,अशोक साळवे ,परसराम मराठे ,भरत जाधव, संजय विधाते, नवनाथ तांदळे ,महादेव डोके यांनी मार्गदर्शन केले या बैठकीस दौलावडगाव गटातील महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ,भारतीय जनता पार्टी व शिंदे शिवसेना गटाचे सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेहबूब भाई शेख हे होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा, कैलास वायभासे यांनी केले तर आभार दिलीप तांदळे यांनी आभार मानले , कार्यक्रमाचे उत्तम असे नियोजन हरीभाऊ दहातोंडे, शामराव फसले ,सतीश कोहक ,नंदू फसले ,कैलास वायबसे, परसराम मराठे महादेव डोके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी वाल्मिक तात्या निकाळजे, युवा नेते यश भैया आजबे अशोक साळवे जिल्हा सरचिटणीस शंकर देशमुख जिल्हा परिषद सदस्य वर्ष माळी माजी सदस्य नवनाथ तांदळे भाऊसाहेब लटपटे परसराम मराठे संजय विधाते युवकचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले सरपंच पंडित पोकळे संदीप नागरगोजे अक्षय हळपावत सरपंच पोपटराव शेकडे भरत जाधव विठ्ठलराव नागरगोजे विठ्ठल आडसरे शरद दळवी माणिक मराठे शिवाजी शेकडे प्राचार्य दानवे सर म्हातारदेव शेकडे संजय गुंड मुकेश घाटविसावे राजेंद्र पवार बाबासाहेब मस्के भारत भाऊ मस्के विशाल भाऊ झांबरे अर्जुन काकडे उपसरपंच राजेंद्र पवार जे बी आवटे एडवोकेट प्रदीप वायबसे दिलीप तांदळे प्राध्यापक कैलास वायबसे प्राचार्य सोपानराव शेकडे रामहरी ठोंबरे संजय गुंड गणेश खाडे रावसाहेब दळवी मुरलीधर शेकडे हरिभाऊ तांदळे बबनराव रांजणे सिद्धेश्वर झांजे रामदास आवटे निलेश पवार पप्पू नाना खाडे अमोल रांजणे अनिल मोहिते महेश गुंजाळ बंडू गुंजाळ विठ्ठल तळेकर नवनाथ इथापे संजय विधाते नितीन आमटे विश्वनाथ आप्पा झांजे सतीश कोहक शामराव फसले हनुमंत शेकडे शरद मस्के अशोक चव्हाण उद्धव घोडके यांच्यासह हजारो महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## पंधरा दिवसातच विक्रमसिंह कळमकर यांना धक्का !

# गावचे उपसरपंच, सदस्य तसेच सोसायटी चेअरमन व संचालकांनी सोडली साथ;लंके यांच्या गोटात डेरेदाखल

**पारनेर । प्रतिनिधी**

नीलेश लंके यांच्या माध्यमातून पाडळी रांजणगावमध्ये कोट्यावधी रुपयांची विकास कामे मार्गी लागलेली असतानाही केवळ स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी लंके यांची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात दाखल झालेल्या व त्यानंतर पक्षाच्या तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारलेल्या विक्रमसिंह कळमकर यांना पंधरा दिवसातच त्यांच्या गावातूनच धक्का बसला आहे. !

विक्रमसिंह कळमकर यांनी नीलेश लंके यांची साथ सोडून अजित पवार गटात प्रवेश करण्याचा एकतर्फे निर्णय घेतल्यानंतर त्याचे पडसाद त्यांच्या गाव पातळीवर उमटले. सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी मागणी केल्याप्रमाणे नीलेश लंके यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी दिलेला असतानाही केवळ स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी किंवा यापूर्वी केलेल्या विविध निवडणुकीतील तडजोडीसाठी विक्रमसिंह यांनी कोणालाही विचारात न घेता लंके यांची साथ सोडली. अजित पवार गटात प्रवेश करण्याचा व पर्यायाने तालुक्यातील लोकसभेचे उमेदवार नीलेश लंके यांना विरोध करण्याचा निर्णय घेतला. कळमकर यांनी मागील पंचायत समिती निवडणुकीत पक्षाच्या ध्येय धोरणांना तिलांजली देत अपक्ष उमेदवारी



करत पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करण्याचे काम केले होते. पुढे बाजार समितीची निवडणूक तसेच सैनिक बँकेच्या निवडणुकीतही त्यांनी लंके यांच्या सहकाऱ्यांना विरोधात काम केल्याची चर्चा आहे. असे असताना कळमकर यांनी विखे यांना साथ देण्याचा घेतलेला निर्णय त्यांनी यापूर्वी पक्ष विरोधी कारवयांशी सुसंगत असल्याची प्रतिक्रिया गावचे ग्रामस्थ देत आहेत.

दरम्यान, कळमकर यांची भूमिका न पडल्याने शनिवारी नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा श्रीगोंदा तालुक्यातील माठ या ठिकाणी आली असता पाडळीच्या ग्रामस्थांनी नीलेश लंके यांची भेट घेतली. तुम्हाला गावातून जास्तीत जास्त मताधिक्य देण्याची ग्वाही दिली.

यावेळी पाडळीच्या विद्यमान उपसरपंच वैशाली करंजुले,सेवा संस्थेचे चेअरमन डी. बी. करंजुले,विठ्ठल साठे, किरण साठे, नितीन साठे, राजू साठे, सदाशिव कळमकर प्रथम करंजुले, गणेश करंजुले, कारभारी पोटघन, सतीश भालेकर आदी उपस्थित होते. आमच्या गावातून कोणी कुठेही कोणत्याही पक्षात प्रवेश केला असला तरी त्यामूळे आपल्या मतदानावर काही फरक पडणार नाही. राजकारणात आम्हीच विक्रमला मोठे केले होते, याची आठवणही ग्रामस्थांनी यावेळी करून दिली.

### आमचा विश्वासघात केला

**आम्हाला विश्वासात न घेता चुकीचा विक्रम यांनी निर्णय घेतला. आम्ही या निर्णयाशी विक्रम कळमकर यांच्या सोबत नाही. पाडळी रांजणगावचे स्वाभिमानी ग्रामस्थ लंके साहेबांसोबत कायम राहणार आहेत. तालुक्याचा स्वाभिमान म्हणून त्यांना आम्ही जास्तीत जास्त मताधिक्य देणार आहोत. –विठ्ठल साठे**

### पाडळीकर संकट काळात साथ सोडत नाहीत

नीलेश लंके यांच्या रूपाने देश स्वतंत्र झाल्यानंतर पारनेर तालुक्याचा प्रथमच खासदार होणार आहे. मतदार संघातील सर्वसामान्य जनता आपल्या माणसाला डोक्यावर घेत असताना घरातले माणसे अमिषाला बळी पडत असतील तर ही संस्कृती सेनापती बापट, अण्णा हजारे यांच्या तालुक्याला कधीही मान्य होणार नाही. पाडळीकर संकट काळात साथ सोडणारे नाहीत तर साथ देणारे म्हणून सदैव स्मरणात राहतील. मताधिक्य देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**डी.बी.करंजुले,चेअरमन**

# महाविकास आघाडीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय संविधाने शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील गरीब, वंचित, दुर्बल, उपेक्षित बांधवांना समानतेचा हक्क आणि स्वाभिमानासाठी लढण्याचे बळ दिले. शिका आणि संघटीत व्हा या त्यांच्या संदेशाने बहुजनांच्या कित्येक पिढ्यांचे कल्याण केले. त्यांचे प्रत्येक क्षेत्रातील असामान्य कार्य आपणास नेहमीच प्रेरणादायी राहील. नागरिकांना एक मताचा समान अधिकार, सर्वांना स्वाभिमानाने जगण्याची, विकासाची समान संधी संविधानाद्वारे उपलब्ध करुन देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर युगपुरुष होते, असे प्रतिपादन जि.प.सदस्या राणीताई लंके यांनी केले.

महाविकास आघाडीच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्केट यार्ड चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जि.प.सदस्या राणीताई निलेश लंके, शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सुरेखा कदम, संजय शेंडगे, अशोक गायकवाड, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, शाम नळकांडे, वसंत शिंदे, संजय गारुडकर, दत्ता जाधव, नलिनी



गायकवाड, संग्राम कोतकर, परेश लोखंडे, योगिराज गाडे, गौरव ढोणे, सचिन शिंदे, फारुक रंगरेज, प्रशांत गायकवाड, दिपक भोसले, बबलू शिंदे आदि उपस्थित होते. याप्रसंगी संभाजी कदम म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे कुठल्याही एका जातीच्या, धर्माच्या पंथाच्या, प्रांताच्या कल्याणासाठी नव्हते तर अखिल मानवजातीच्या कल्याणाची ताकद त्यांच्या विचारांमध्ये आहे. आपणही समाजात काम करतांना त्यांचे विचार आत्मसात करुन त्याप्रमाणे कार्य केल्यास समाजातील दु:ख दुर होण्यास मदत होईल, असे सांगितले.याप्रसंगी अभिषेक कळमकर म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि स्वतंत्र भारताचे पहिले न्याय मंत्री होते. ते एक प्रख्यात कार्यकर्ते आणि समाजसुधारक होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलितांच्या आणि मागासवर्गीयांच्या उत्कर्षासाठी दिले. त्यांना समानतेचा अधिकार मिळवून दिला. आंबेडकर यांनी नेहमीच जातीभेद संपवण्यासाठी संघर्ष केला. त्यांचे काय सर्वांसाठी दिशादर्शक असेच आहे.

# बीएसएनएल मध्ये विविध उपक्रमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील बीएसएनएल मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी बुध्द वंदना घेऊन डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला बीएसएनएलचे उपमहाप्रबंधक विश्वनाथ वाघ व सेवा असोसिएशनचे मुख्य सल्लागार प्रदीपकुमार जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक प्रबंधक चौरे, पिंपरकर, झोळे, गजेंद्र पिसे, विजय शिपनकर, गणेश जोशी, मिनल गुणे, समीर मल्लेभारी, महेश पवार, कवयित्री तथा शिर्डी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सुलभा महेश पवार, शिल्पा जावळे आदींसह बीएसएनएलचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

प्रदीपकुमार जाधव म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांना शालेय जीवनापासून बॅरिस्टर होण्यापर्यंत व संविधानाची रचना करे पर्यंत अनेक अपमान, हाल–अपेष्टा सहन कराव्या लागल्या. पण संविधानात बदल्याची भावना आजीबात दिसत नाही. सर्व जाती–धर्माला



न्याय बंधुता आणि समानता त्यांनी बहाल केली. त्यांना बैलगाडीवाल्याने गाडीत बसू दिले नाही, पण बाबासाहेबांनी नंतर विमानाने प्रवास केला. त्यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. त्यांना शाळेत शिकू दिले नाही, मात्र त्यांनी संघर्षाने उच्च शिक्षित होवून भारताचे संविधान लिहिले हे या महामानवाची महानता असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या जीवनावर भाषण केले. तसेच बाबासाहेबांच्या जीवनावर प्रश्नमंजुषेची स्पर्धा रंगली होती. यामधील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. मुख्याध्यापिका सुलभा महेश पवार यांनी कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र पिसे यांनी केले. आभार प्रशासकिय अधिकारी राहुल मोरे यांनी मानले

# मनपा शाळांचा समर कॅम्प ला सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या शाळेत स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा प्रकल्प राबविला जात असून या प्रकल्प अंतर्गत smart Guru App निर्मिती अनुपस्थित विद्यार्थ्यासाठी सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूम,ची स्थापना,दिव्यांग विद्यार्थ्यासाठी दिव्यांग मित्र ,सेमी इंग्रजी वर्ग,आम्हाला खेळू ध्या, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,शैक्षणिक दैनंदिनी, कंटेनर लायब्ररी, संगीत व क्रीडा शिक्षक यांची नियुक्ती, असे विविध उपक्रम राबविले आहेत. त्या मुळे मनपा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन पालकांचा बदललेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ वर्षांमध्ये सुद्धा मनपा शाळांचे वर्षभराचे शैक्षणिक कॅलेंडर तयार करण्यात येत असून त्या अंतर्गत मनपाच्या ११ केंद्रीय शाळेत आजपासून समर कॅम्प ला सुरुवात झाली आहे.



मनपा के प्रा शाळा ज्ञळीरवर्िीिर पे १ या शाळेत गणेश दांडगे नियंत्रण अधिकारी,भारत तीनगोटे शिक्षणाधिकारी आणि ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी यांच्या हस्ते समर कॅम्प चे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी रइसा बेगम मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक ,आणि पालक व विद्यार्थी उपस्थित होते .

समर कॅम्प दिनांक १५ ते ३० एप्रिल २०२४ या दरम्यान घेण्यात येणार असून या समर कॅम्प मध्ये संगीत,गायन वादन,चित्रकला ,क्रीडा,कार्यानुभव, शाळा पूर्व तयारी मेळावा ,पारंपारिक खेळ ,भाषा/ गणित सह मला बी इंग्लिश शिकायचे आहे, असे विविध उपक्रम घेतले जाणार आहेत.

# निवडणुक खर्चासाठी उमेदवारांना स्वतंत्र बँक खाते उघडणे अनिवार्य

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवतांना निवडणूक खर्चासाठी उमेदवारांना स्वतंत्र बँक खाते उघडणे अनिवार्य असून त्याची माहिती आपल्या उमेदवारी अर्जासोबत देणे आवश्यक आहे,अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

जिल्हा नियोजन सभागृहात आज राजकीय पक्ष प्रतिनिधींना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी ही माहिती सादरीकरणाद्वारे दिली. लोकसभेसाठी उमेदवारीचे निकष, जोडावयाची आवश्यक कागदपत्रे, उमेदवारी अर्ज दाखल करतांना पाळावयाची संहिता, दाखल गुन्ह्यांच्या माहितीचे सार्वजनिकरित्या वृत्तपत्रातून करावयाचे प्रकटीकरण इ. बाबींची माहिती देण्यात आली. उमेदवाराचे छायाचित्र कसे असावे याबाबतही माहिती देण्यात आली.

## मनाई आदेश लागू

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आगामी काळात जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी दि.३० एप्रिल पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात येत असल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. त्याअन्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगणे, दाहक स्फोटक पदार्थ बाळगणे, पाच किंवा अधिक व्यक्तिंना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमणे, निदर्शने करण्यास मनाई करण्यात आली आहे. यासंदर्भात पूर्वपरवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक ग्रामिण यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना राहतील,असेही अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी स्पष्ट केले आहे.

# ही निवडणूक लोकसभेसाठीची नाही, तर देशाच्या विकासाची:महायुतीत एकजूट ठेवा

## विरोधकांचे डिपॉझिट जप्त होईल, मुख्यमंत्र्यांचा दावा



**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**–यंदाची लोकसभा निवडणूक ही केवळ लोकसभा निवडणूक नसून ती विकासाची निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी ही निवडणूक आहे. महायुतीत एकजूट ठेवा, विरोधकांचे डिपॉझिट जप्त होईल, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गेल्या ५० वर्षात जे देशाच्या विकासाला बाधक ठरले, ज्यांनी देशाला आणि राज्याला मागे ठेवले, त्यांना चारीमुंड्या चित करण्याची ही निवडणूक आहे. जी कामे पन्नास वर्षात झाली नाहीत, ती मागील दहा वर्षात झाली आहेत. अयोध्येच राम मंदिर बांधणार, पण तारीख नाही सांगणार, अशी टीका करणाऱ्यांना मंदिर उभे करून दाखवले, असे त्यांनी म्हटले आहे.सीएम शिंदे म्हणाले की, आर्थिक विकासात देश जगात अकराव्या स्थानी होता. तो आता पाचव्या स्थानी आला आहे. भविष्यात तो तिसऱ्यांस्थानी आणण्याचा प्रयत्न मोदी करीत आहेत. याच विकासाला साथ देण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करायचे आहे,असे शिंदे म्हणाले.सीएम शिंदे म्हणाले की, २०४७ साली देशाला आर्थिक महासत्ता बनवायचा अजेंडा आहे. आपल्याकडे नेतृत्व आहे. नियोजन आहे. सरकार तुमचे,आमचे, सर्वसामान्यांचे आहे. हे सर्व जनतेसमोर घेऊन जा, महायुतीतील सर्व पक्षांनी एकजूट ठेवली तर विरोधकांची डिपॉझिट जप्त होईल.महायुतीचे कोल्हापूरचे उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील माने यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज चांगलीच बिल्डिंग लावल्याचे चित्र पाहायला मिळाले. मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत जिल्ह्यात महायुतीचे दोन्ही उमेदवार निवडून आले पाहिजेत, यासाठी पदाधिकारी कार्यकर्त्यांना सूचना दिल्या.

## मुकेश जिवतोडे यांच्या वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

# रक्तदान शिबीर राबवून शिवसैनिकांनी साजरा केला जिल्हाप्रमुखाचा वाढदिवस







**वरोरा । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या वाढदिवसानिमित्य विविध उपक्रम राबविण्यात आले होते. यामध्ये शिवसेना जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण ५० महिला व पुरुष रक्तदात्या शिवसैनिकांनी रक्तदान करत जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे याना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे पक्षसंघटनेसोबतच नेहमी सामाजिक उपक्रम राबवित असतात. विद्यार्थाना मदत,रुग्णांना मदत, दिव्यांगनासाठी विविध उपक्रम व समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यातही ते नेहमी अग्रेसर असतात. अशातच त्यांच्या वाढदिवसानिमित्य सामाजिक उपक्रमाने साजरा करण्याच्या कल्पकतेने शिवसैनिकांनी जिल्हा कार्यालय येथे रक्तदान शिबीर राबविले होते. या रक्तदान शिबिरामध्ये पुरुष रक्तदात्या बरोबरच महिला रक्तदात्यांची सुद्धा सहभाग घेत रख्यदान केले. यासाठी नागपूर येथील अमन रक्तपेढीच्या चमूने प्रचारात करण्यात आले होते. यामध्ये एकूण ५० रक्तदात्यांची रक्तदान करत जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, युवासेनेचे गोंदिया जिल्हा विस्तारक मनीष जेठानी, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले युवासेना जिल्हा सनमवयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, शहर प्रमुख संदीप मेश्राम,माजी तालुका प्रमुख बंडू चटपल्लीवर, तालुका संघटक बाळा क्षीरसागर,शहर संघटक किशोर टिपले, शिवदूत बंडुजी डाखरे, शिवदूत रामशोक दडमल, शिवदूत बालाजी जिवतोडे, शिवदूत मनिष ठक, माजी नगरसेविका सुषमा किशोर भोयर,उपसरपंच साधना मानकर,माजी नगरसेविका प्रणाली संदीप मेश्राम, उपशहर प्रमुख मनीष दोहतरे,उपशहर प्रमुख गजू पंधरे, उपशहर प्रमुख राहुल दारुण्डे, उपतालुका प्रमुख राजु राऊत, उपतालुका प्रमुख महेश देवतळे,उपतालुका प्रमुख मंगेश ढेंगळे, उपतालुका प्रमुख राजु आसुटकर,विभाग प्रमुख अनिल सातपुते,विभाग प्रमुख प्रकाश कुरेकार, विभाग प्रमुख बाळू विरुटकर,विभाग प्रमुख किशोर ढवस, विभाग प्रमुख विशाल शेंडे,विभाग प्रमुख रवी वाटकर, विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे

युवासेना उपजिल्हा प्रमुख महेश जिवतोडे,विधानसभा सनमवयक निखिल मांडवकर,तालुका प्रमुख ओंकार लोडे, तालुका प्रमुख राहुल मालेकर,शहर प्रमुख पियुष सिंग,उपतालुका प्रमुख अमोल काळे, उपतालुका प्रमुख रोशन खोंडे, महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख कीर्ती पांडे,युवती सेना तालुका प्रमुख तेजस्विनी हनुवते, वंदना बंडुजी डाखरे, रीमा मुकेश जिवतोडे, रोहिणी मनोज जिवतोडे, वाल्मिक गौरकार, बळीराम चवले,प्रविण गौरकार, महादेव बोधाने,किशोर ढेंगळे,शालिक डुकरे,तुषार पाल, हरी वैद्य,बालाजी तुरानकर, आशिष झाडे, माधव पिंगे, भुषण थाटे,समस्त पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक, महिला संघटिका, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वत:च्या व देशाच्या उज्वल भविष्यासाठी निर्भिडपणे मतदान करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे मतदारांना पत्राद्वारे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


प्रत्यक्ष मतदानाची वेळ अगदी जवळ आली असून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. शिवाय मतदानातूनच आपण आपले व देशाचे उज्वल भविष्य निश्चित करू शकतो. त्यामुळे मतदारांनो, कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भिडपणे मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सामील व्हा, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

जिल्ह्यातील मतदारांच्या नावे संदेशपत्र लिहून जिल्हाधिका–यांनी नागरिकांना मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आवाहन सुद्धा केले आहे. पुढे ते म्हणतात, भारत हा उत्सवप्रिय देश आहे. प्रत्येक उत्सव आपण सर्वजण मोठ्या आनंदाने साजरा करीत असतो. यावर्षी सुद्धा लोकशाहीचा उत्सव देशभरात साजरा होत आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश मानला जातो. या लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आणि देशाच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवून मतदानाचे कर्तव्य पार पाडायचे आहे.

भारतीय संविधानाने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे. या मतदानाच्या माध्यमातूनच आपण आपले भविष्य घडवू शकतो. देशाच्या भविष्यासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, म्हणून मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्हा प्रशासन नि:ष्पक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणुका घेण्यासाठी कटिबध्द आहे.

त्यामुळे येत्या १९ एप्रिल २०२४ रोजी १३ – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी होणा–या निवडणुकीत सहभागी व्हा. विशेष म्हणजे कोणाच्याही दबावात न येता निर्भिडपणे मतदान करा. लक्षात ठेवा मतदानाची वेळ ही सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे. त्यामुळे सर्व कामे बाजुला ठेवून कर्तव्य म्हणून सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिका–यांनी पत्रातून केले आहे.


# इतर जिल्ह्यातील राजकीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रचाराची मुदत संपल्यानंतर बाहेर जिल्ह्यातील जे राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते चंद्रपूर लोकसभा मतदार संघात उपस्थित असतील, त्यांनी तात्काळ चंद्रपूर लोकसभा मतदार संघ सोडावा. येत्या ४८ तासांमध्ये बाहेर जिल्ह्यातील राजकीय पक्षासोबत संबंधित पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांनी मतदारसंघात राहू नये. असे व्यक्ती सभागृह, हॉटेल किंवा इतर ठिकाणी थांबले असतील, तर त्याबाबत प्रशासनाला तात्काळ कळवावे, असे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी म्हटले आहे.

# रामनवमी निमित्त काळाराम मंदिर येथून निघालेल्या रथयात्रेचे आ.किशोर जोरगेवार यांनी केले स्वागत





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रामनवमी निमित्त काळाराम मंदिर येथून रथयात्रा काढण्यात आली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी रथयात्रेचे स्वागत करत प्रभु श्री रामाची पुजा अर्चना केली त्यांनतर रथयात्रेला शुभारंभ करण्यात आला. यावेळी मनिष महाराज व काळाराम मंदिर विश्वस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

देशभरात आज रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. चंद्रपूरातही रामनवमी निमित्त संपुर्ण शहर सजुन निघाले होते. दिवसभरच शहरातील विविध मंदिरात पुजा अर्चना करण्यात आली. तर संध्याकाळी शहरातील मंदिरांमधून शोभायात्रा काढण्यात आल्या. काळाराम मंदिर येथून श्री प्रभु रामचंद्र यांची रथयात्रा काढण्यात आली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. आमदार किशोर जोरगेवार यांनी पुजा केल्या नंतर सदर रथयात्रेला सुरवात झाली. ही रथयात्रा शहराच्या मुख्यमार्गाने होत जटपूरा गेटला वळसा घालुन पून्हा कळाराम मंदिर येथे दाखल झाली या शोभायात्रेत शेकडो रामभक्त सहभागी झाले होते.

# शहरात असलेल्या एकमेव उभा शंकर पार्वती मंदिरातील अनोख्या शिव पार्वती विवाह सोहळ्याची जय्यत तयारी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत शहरातील रंगार गल्लीत असलेल्या उभ्या शंकर पार्वती मंदीरामध्ये तिथी अष्टमी दिनांक २९-३-२०२३ रोजी. साध्य.७.५वा. शिव- पार्वती विवाह सोहळा सपंन्न होणार आहे. त्याची जय्यत तयार सूरू आहे.

सविस्तर वृत्त असे की,

भारतात कूठेच ऊभी शिव पार्वतीची मूर्ती नाही. पण मानवत येथे प. पु. वेदमुर्ती संपन्न शिवैक्य गंगाधर (बापु)जंगम ( स्वामी) यांनी या मंदिराची प्राणप्रतिष्ठा केली आहे. याच मंदिराच्या पाठीमागे एक विहीर आहे,यातुन एक भुयारी मार्ग आहे याघरवजामंदिराच्या तळमजळयाखाली नित्य नियमाने पुजा अर्चा करत असताना गंगाधर महाराजांना आकाशवाणी झाली मला या विहीरीतुन बाहेर काढ आणि माझी स्थापना कर, यातुन ही शंकर पार्वती आणि नंदीची मूर्ती सापडली आणि यांची स्थापना केली. जो भक्त खर्या श्रध्देने मनोभावे भक्ती करेल , यांना या देवतांचे तिनं रूप दिसतात सकाळी प्रहारी. बालपण , दुपारी तरूणपण , सायंकाळी वृध्द पण असे तिन रूप दिसतात, या समोर असलेल्या नदीवर बसुन शंकरपार्वती गावप्रदक्षणा घालतात म्हणून सायंकाळी या मंदिराच्या दरवाजाजवळ थाबुनये असा संकेत आहे. वैशिष्ट्ये शंकराला चार हात आहेत हातात त्रिशुल , रिंग आहे जठेमध्ये गंगा आहे, सोबत पार्वती ही ३.५फुट उंचीची आणि शंकर ४फुट उंचीचे सावळ्या रंगात उभी मुर्ती ही भारतात एकमेव मुर्ती आहे. या मंदिराचा काळखंड सांगता येत नाही कारण ही अतिप्राचिन मंदिर आहे. छोट्या अरूंद रस्ता मध्ये एक घरवजा मंदिर बांधले आहे. *काशिनाथ जंगम परिवारातील जंगम (स्वामी ) परिवार पाच सहा पिढ्यांपासून या मंदिराची सेवा करतात गंगाधर बापु हे या कुटुंबाचे पुर्वज आहे. आज घडिला *माजी नगराध्यक्ष नंदकुमार महादेव स्वामी (जंगम) आणि परिवार मंदिर सेवाधारी आहे. उर्वरीत कुटुंब परभणी येथे आहे *विरेश अण्णासाहेब जंगम (स्वामी), शंभोलिंग अण्णासाहेब जंगम (स्वामी) , महालिंग अण्णासाहेब जंगम (स्वामी) महेश मन्मथ जंगम (स्वामी) *दिनेश मन्मथ जंगम (स्वामी) माहिती सादर करते. सामाजिक कार्यकर्त्या *वीरशैव विचार मंच संस्थापक अध्यक्ष चित्रकार महेश मन्मथ जंगम (स्वामी) यांनी या विवाह सोहळ्या विषयी माहीती दिली.

# मतदान केंद्रावरील निवडणूक पथकांची तिसरी सरमिसळ प्रक्रिया पूर्ण


## सामान्य निवडणूक निरीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांची उपस्थिती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी केंद्रावर जाणा-या निवडणूक पथकांची तिसरी सरमिसळ (रॅन्डोमायझेशन) प्रक्रिया बुधवारी (दि. १७) निवडणूक आयोगाने दिलेल्या संगणक प्रणाली द्वारे पार पाडण्यात आली. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. उपस्थित होते. या प्रक्रियेनुसार, कोणत्या मतदान केंद्रावर कोणते पथक जाईल, हे मतदानाच्या एक दिवसापूर्वी म्हणजे १८ एप्रिल २०२४ रोजी संबंधित पथकांना कळविण्यात येणार आहे.

१३ – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शुक्रवार दि. १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळत होणार आहे. यापूर्वी सरमिसळ प्रकियेने प्रत्येक मतदारसंघनिहाय मनुष्यबळाचा पुरवठा करण्यात आला असून मतदान पथकांचे दोन प्रशिक्षणसुध्दा घेण्यात आले आहे. बुधवारी पार पडलेल्या तिस–या सरमिसळ प्रक्रियेने कोणत्या मतदान पथकाला कोणते मतदान केंद्र मिळणार आहे, ते निश्चित झाले आहे. सामान्य निवडणूक निरीक्षक यांच्या स्वाक्षरीने सदर माहिती सीलबंद लिफाफामध्ये टाकून प्रत्येक विधानसभा मतदार संघातील सहायक निवडणूक अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. यानंतर सहायक निवडणूक अधिकारी हे प्रत्येक पथकांना मिळालेल्या मतदान केंद्राबाबत माहिती देऊन मतदानाचे संपूर्ण साहित्य घेऊन रवाना करणार आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडलेल्या या प्रक्रियेकरीता निवासी उपजिल्हाधिकारी तथा मनुष्यबळ



व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी संजय पवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, राष्ट्रीय सुचना केंद्राचे प्रमुख गणेश खडसे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले आदी उपस्थित होते.

असे आहे विधानसभा मतदारसंघनिहाय मनुष्यबळ : राजुरा विधानसभा मतदारसंघात ३३० मतदार केंद्र असून एकूण मनुष्यबळ १४७२ आहे तर ३८ पथक राखीव आहेत. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात ३८३ मतदार केंद्र, एकूण मनुष्यबळ १७०० तर ४२ पथक राखीव, बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात ३६१ मतदार केंद्र, एकूण मनुष्यबळ १६०० तर ३९ पथक राखीव, वरोरा विधानसभा मतदारसंघात ३४० मतदार केंद्र, एकूण मनुष्यबळ १५१२ तर ३८ पथक राखीव, वणी विधानसभा मतदारसंघात ३३८ मतदार केंद्र, एकूण मनुष्यबळ १५०४ तर ३८ पथक राखीव तर आर्णि विधानसभा मतदारसंघात ३६६ मतदार केंद्र असून १६२४ मनुष्यबळ आणि ४० पथक राखीव आहेत. अशाप्रकारे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाकरीता एकूण २११८ मतदान केंद्रासाठी ९४१२ मनुष्यबळ उपलब्ध असून २३५ पथके राखीव आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .